**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक ०८ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **चित्रपटांच्या माध्यमातून पर्यटनाला चालना शक्य असल्याचं वित्त राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांचं प्रतिपादन.**
2. **दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गांवर सुरू होणार एसटीच्या ५५ आसनी "राजमाता जिजाऊ" या नव्या बसेस.**
3. **संत नगरी शेगाव इथं संत गजानन महाराजांच्या १४८ व्या प्रकट दिन सोहळ्यानिमित्त भाविकांची अलोट गर्दी.**
4. **राष्ट्रीय पंचायत पुरस्कार 2025 साठी नामांकने सादर करण्याचं आवाहन.**

**आता सविस्तर बातम्या .......**

ॲडव्हान्टेज विदर्भ

चित्रपट हे पर्यटन प्रोत्साहनाचं प्रभावी माध्यम ठरू शकतं, असं प्रतिपादन वित्त राज्यमंत्री ॲडव्होकेट आशिष जयस्वाल यांनी केलं. असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटच्या ॲडव्हान्टेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवांतर्गत आज समारोपाच्या दिवशी पर्यटन प्रोत्साहनावर पॅनल चर्चा संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते. विविध चित्रपटांमुळे अनेक पर्यटनस्थळांना नवसंजीवनी मिळाल्याचंही त्यांनी नमूद केलं. याच धर्तीवर रामटेकचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कवीश्रेष्ठ कालिदास यांच्यावर आधारित चित्रपट निर्मितीचा प्रस्ताव चित्रपट दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांना देण्यात आल्याची माहिती जयस्वाल यांनी दिली. कालिदास यांच्यावर चित्रपट तयार झाल्यास, त्या चित्रपटाचा सेट पुढे पर्यटनस्थळ म्हणून खुला करण्याचा मानस असल्याचही त्यांनी सांगितल. पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा आवश्यक असून, एआयडीच्या माध्यमातून मागील वर्षी सुचविण्यात आलेल्या शिफारसी पर्यटन धोरणात समाविष्ट करण्यात आल्याच जयस्वाल म्हणाले.

मुख्यमंत्री अहल्यानगर

राज्यात परकीय गुंतवणुकीतून उभ्या राहात असलेल्या उद्योगांची संख्या वाढत असून, ७५ टक्के करार हे प्रत्यक्षात उतरत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज अहिल्यानगरमध्ये एका ॲल्युमिनियम कास्टिंग कंपनीनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. गेल्या वर्षी दावोस येथे झालेल्या गुंतवणूक करारांमधून उत्तर महाराष्ट्रातल्या ५ जिल्ह्यांमध्ये रोजगाराच्या ७५ हजार संधी उपलब्ध झाल्या असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. या करारांच्या माध्यमातून होणार असलेल्या ५० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकी पैकी एकट्या अहिल्यानगर जिल्ह्यात ११ हजार ५१९ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

मोहन भागवत

भारत तोडण्याचा विचार करणारे स्वतःच तुटतील; हा 1947 चा भारत राहिलेला नाही. आगामी 2047 मध्ये अखंड भारताच्या उदयाची कल्पना आपण सर्वांनी करायला हवी, असं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केली . संघ स्थापनेच्या 100 वर्षांच्या निमित्ताने मुंबईत आयोजित 'नवे क्षितिज' या कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात ते बोलत होते. दरम्यान 'हिंदू' हे नाम नसून एक विशेषण आहे असं प्रतिपादन सरसंघचालक मोहन भागवत यांनी केलं आहे. ते काल मुंबईत संघाच्या शताब्दी सोहळ्यात बोलत होते. भारतात कोणीही अहिंदू नसून त्यांचा सध्याचा धर्म कोणताही असो, समान वंश आणि सांस्कृतिक वारसा ते अधोरेखित करतात असं भागवत म्हणाले. हिंदू हा शब्द बाहेरून लादलेली ओळख म्हणून पाहिला जाऊ नये, तर भारताच्या मूल्यांशी जोडलेल्या लोकांसाठी एक

सर्वसमावेशक विशेषण म्हणून पाहिले पाहिजे, ज्यात भूमीबद्दलचा अभिमान, तिच्या संस्कृतीबद्दलची प्रशंसा आणि पूर्वजांचा सामायिक गौरव यांचा समावेश आहे, असं त्यांनी सांगितलं.

## जिल्हा परिषद निवडणूक

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी काल शांततेत मतदान झालं. या निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या ७ हजार ४३८ इतक्या उमेदवारांचं भवितव्य काल मतदान यंत्रांमध्ये बंद झालं असून उद्या सकाळी १० वाजता मतमोजणी सुरू होणार आहे. या निवडणुकीसाठी काल एकूण ६८ पूर्णांक २८ शतांश टक्के झालं. सर्वाधिक ७४ पूर्णांक ८९ शतांश टक्के मतदान परभणी इथं तर रत्नागिरीत सर्वात कमी ५५ पूर्णांक ७९ शतांश टक्के इतकं मतदान झालं.

## जिजाऊ बसेस

महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला आधुनिकतेची जोड देत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात लवकरच नव्या दमाच्या बसेस दाखल होत आहेत. गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागू नये, यासाठी 3 बाय 2 आसन रचनेच्या 55 आसनी अत्याधुनिक बसेस खरेदी करण्यात आल्या आहेत. या नव्या गाडयांना 'राजमाता जिजाऊ' यांचे नाव देण्यात आले असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

या बसेस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असून, भगव्या आणि शुभ्र पांढऱ्या रंगसंगतीत सजलेल्या या बसेस महाराष्ट्राच्या परंपरेचे आणि अभिमानाचे चालते-बोलते प्रतीक ठरणार आहेत, असं ते म्हणाले. सध्याच्या बसेसची आसन क्षमता साधारण 40 प्रवासी इतकी असताना, नव्या बसेसमध्ये 55 प्रवासी आरामात बसू शकतील. त्यामुळे ही सेवा दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गांवर सुरू करण्याचा एसटीचा मानस आहे, अस मंत्री सरनाईक यांनी सांगितलं.

## शेअर बाजार

गेले सलग तीन महिने भारताच्या शेअर बाजारातून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक काढून घेत असलेल्या परकीय गुंतवणुकदारांनी, फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्याच आठवड्यात पुन्हा एकदा ८ हजार १२९ कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक केली आहे. अमेरिका आणि भारतात झालेला व्यापारी करार आणि अर्थसंकल्पातल्या सकारात्मक तरतुदींमुळे परकीय गुंतवणूकदारांचा विश्वास पुन्हा वाढला असल्याचं तज्ञांनी म्हटलं आहे.

## प्रकट दिन

बुलढाणा जिल्ह्यातील संत नगरी शेगाव इथल्या संत गजानन महाराजांचा आज १४८ वा प्रगट उत्सव सोहळा मोठ्या थाटात संपन्न होत आहे. राज्यभरातून लाखो भाविक गजानन महाराजांच्या दर्शनासाठी शेगाव इथ दाखल झाले आहेत. यानिमित्त २ फेब्रुवारीपासून विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. आज पहाटे ५ वाजता संत गजानन महाराज संस्थानात अवभृत स्नान पार पडले. दुपारी शेगाव शहरातून पालखीची परिक्रमा सुरू होऊन अनेक भजनी दिंड्या गण गण गणात बोतेच्या नामस्मरणात भक्ती भावाने सहभागी झाल्या. संत गजानन महाराज यांचा १४८ वा प्रकटदिन आज नागपुरात विविध ठिकाणी साजरा करण्यात आला. नागपुरातील झेंडा चौक महाल इथल्या गजानन महाराज मंदिरात सकाळ पासूनच भाविकांनी श्रीच्या प्रासादिक पादुकांच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. तसच टाळ मृदुगाच्या गजरात भजन किर्तन करीत महाराजांची पालखीसह मिरवणूक काढण्यात आली. बुलढाण्यासह विदर्भात अनेक ठिकाणी प्रकट दीनानानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांच आणि महाप्रसादाच आयोजन करण्यात आल आहे.

पंचायत पुरस्कार- महाराष्ट्र परिचय केंद्र दिल्ली

केंद्र सरकारच्या पंचायती राज मंत्रालयामार्फत राष्ट्रीय पंचायत पुरस्कार 2025 साठीची नामांकन प्रक्रिया अधिकृतपणे सुरू करण्यात आली आहे. याअंतर्गत राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींची नामांकनं सादर करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. या पुरस्कारांतर्गत दीनदयाळ उपाध्याय पंचायत शाश्वत विकास पुरस्कार देण्यात येणार असून, ग्रामीण भागात शाश्वत विकासासाठी राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण आणि परिणामकारक उपक्रमांना राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देणे हा या पुरस्काराचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण विकासाला चालना देणाऱ्या आणि स्थानिक पातळीवर परिवर्तन घडवून आणणाऱ्या नेतृत्वाचा योग्य सन्मान होणार असल्याच पंचायती राज मंत्रालयान नमूद केल आहे. इच्छुक ग्रामपंचायती आणि संबंधित संस्थांना आपला PAI स्कोअर pai.gov.in या पोर्टलवर पाहता येणार आहे. तर अधिकृत नामांकने panchayataward.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने सादर करावीत, अस मंत्रालयान स्पष्ट केल आहे.

‘कोया कृषी कुंभ २०२६’

कृषी संस्कृती आणि स्थानिक उत्पादनांना जागतिक व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने गडचिरोली इथ आयोजित ‘कोया कृषी कुंभ ’ या महोत्सवात आज प्रसिद्ध आचारी विष्णू मनोहर यांच्या नेतृत्वात तब्बल ११११ किलो नाचणीचा शिरा तयार करून जागतिक विक्रम प्रस्थापित करण्यात आला. या उपक्रमामुळे गडचिरोली जिल्ह्यातील भरडधान्ये, विशेषतः नाचणी पिकाचे पोषणमूल्य आणि महत्त्व राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाले. नाचणीपासून तयार करण्यात आलेल्या या महाकाय शिऱ्याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स, एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स तसेच वर्ल्ड रेकॉर्ड बुक ऑफ इंडियामध्ये घेण्यात आली आहे. या विक्रमासाठी वापरण्यात आलेली नाचणी ही गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून शाश्वत पद्धतीने उत्पादित करण्यात आली होती.

मंकी फिवर

महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा यांसह संपूर्ण पश्चिम घाट पट्ट्यात दरवर्षी दहशतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या 'कॅसानूर फॉरेस्ट डिसीज' अर्थात 'मंकी फिव्हर'वर भारतीय आयुर्विज्ञान संशोधन परिषदेने पूर्णतः स्वदेशी बनावटीची, सुधारित आणि अधिक प्रभावी लस विकसित केली असून, या लसीच्या मानवी वैद्यकीय चाचणीच्या पहिल्या टप्प्याला आता अधिकृतपणे सुरुवात झाली आहे. महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये काम करणारे वन कर्मचारी, शेतकरी आणि लाकूडतोडे यांना या आजाराचा सर्वाधिक धोका असतो. त्यांच्यासाठी ही लस दिलासा ठरणार आहे.

सुधाकर आठले पुरस्कार

समाजात विज्ञान प्रसार तसेच वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्याकरिता विविध प्रकारे किमान १० वर्षे प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीला मराठी विज्ञान परिषदतर्फे सुधाकर उद्धवराव आठले पुरस्कार देऊन गौरविल जात. पुरस्काराचे स्वरूप रोख रुपये २५,०००/- आणि मानपत्र असे असून हा पुरस्कार एप्रिल २०२६ मध्ये होणाऱ्या मविप वर्धापन दिन कार्यक्रमात प्रदान करण्यात येईल. ६० वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या व्यक्ती या पुरस्काराकरिता अर्ज करू शकतात. पुरस्काराकरिता अर्ज करण्याची अंतिम मुदत २८ फेब्रुवारी असून अधिक माहितीसाठी ९९६९१००९६१ या मोबाईल क्रमांकावर आणि officer1.patrika@mavipa.org या ईमेल वर संपर्क करता येईल.

क्रिकेट विश्वचषक

आयसीसी क्रिकेट टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत आज तीन सामने खेळवले जात आहेत. चेन्नई इथं आजच्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंडने अफगाणिस्तानवर ५ गडी राखून विजय मिळवला. अफगाणिस्ताननं

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत विजयासाठी १८३ धावाचं आव्हान न्यूझीलंडला दिलं होतं. ते न्युझिलंड संघान ५ गड्यांच्या मोबदल्यात केवळ १७ षटकं ५ चेंडूत पूर्ण केलं.

विश्वचषकाचा दुसरा सामना ग्रुप सी मधील इंग्लंड आणि नेपाळ यांच्यात मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर सुरु आहे. इंग्लडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. आर्यलंड आणि श्रीलंका यांच्यातला ग्रुप बी चा सामना कोलंबोच्या के आर प्रेमदासा स्टेडियमवर संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल.

*****